# मंत्रिमंडळ निर्णय

शनिवार, दि. २४ जून २०१७

( विशेष बैठक क्र. १३६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजना<br>राज्यातील शेतकऱ्यांना ३४ हजार २२ कोटी रुपयांची कर्जमाफी | सहकार विभाग |

सहकार विभाग

## छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजना
## राज्यातील शेतकऱ्यांना ३४ हजार २२ कोटी रुपयांची कर्जमाफी

राज्यातील सुमारे ८९ लाख शेतकऱ्यांना ३४ हजार २२ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत घेण्यात आला. राज्यातील सुमारे ४० लाख शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणारी ही कर्जमाफी **छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजना** म्हणून ओळखली जाणार आहे. या योजनेचा लाभ पीक कर्जासह मध्यम मुदतीच्या कर्जधारकांनाही होणार आहे.

दिनांक १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१६ या कालावधीत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना दीड लाख रुपयेपर्यंतचे कर्ज सरसकट माफ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. दीड लाखांहून अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता योजना (One Time Settlement) राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये पात्र थकबाकी रकमेच्या २५ टक्के किंवा दीड लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

२०१२-२०१३ ते २०१५-२०१६ या चार वर्षात ज्या शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले आहे, परंतु ३० जून २०१६ रोजी ते थकबाकीदार असतील अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र, ज्यांनी कर्ज मुदतीत फेडले आहे त्यांना प्रोत्साहन म्हणून पीक कर्जाच्या २५ टक्के अथवा २५ हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती देण्यात येईल.

राज्यातील विविध भागात, जिल्ह्यात झालेला अपुरा पाऊस, अवेळी पाऊस तसेच गारपीट याप्रकारच्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या कारणाने शेतकरी कर्जाची परतफेड करु शकले नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणारी कर्जमाफी देण्याचा हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.

राज्यातील विद्यमान / माजी मंत्री, राज्यमंत्री, विद्यमान / माजी संसद सदस्य, विद्यमान / माजी विधिमंडळ सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, महानगरपालिका सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे तसेच निमशासकीय संस्था आणि अनुदानित संस्थांचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी या कर्जमाफीसाठी पात्र असणार नाहीत. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना यातून वगळण्यात आले आहे.

----o----